


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७७१. वा | मंगळवार | दि. १४ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# डॉ.तडस यांनी निर्लज्जपणे रेंगाळवली जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचाराची चौकशी...

## वारंवार वरिष्ठांकडून पत्र मिळूनही तडसांनी भ्रष्टाचाऱ्यांना वाचवले...

**जनसंचलन/बुलढाणा**


येथील जिल्हा रुग्णालायातील भ्रष्टाचाराची चौकशी होत असताना वरिष्ठांच्या वारंवार पत्रानंतरही त्यांना अहवाल देण्यास तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर नितीन तडस यांनी मोठी बेशरमपणे टाळाटाळ केल्याचे दिसून येत आहे. यावरून तडस यांनी जिल्हा रुग्णालयात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी काहीही करून लांबवण्याचा नतद्रष्टपणा केल्याचे सिद्ध होत आहे, तसेच त्यांनी या भ्रष्टाचारातील भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई होऊ नये, यासाठी प्रसंगी वरिष्ठांच्या आदेशाची पायमल्ली केल्याचे समोर आले आहे. डॉ. तडस यांचा हा नालायकपणा आणि बदमाशी स्पष्टपणे जगासमोर आली आहे, त्यामुळे आता तडस यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी या भ्रष्टाचाराला उघड करणारे तक्रारकर्ते व दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करीत आहे. येथील जिल्हा रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांपासून राजरोसपणे भ्रष्टाचार सुरू आहे. कोरोना महामारीच्या काळात तर भ्रष्टाचाराने संपूर्ण जिल्हा रुग्णालयच व्यापून टाकले होते. जिल्हा रुग्णालयात जिकडे पहावे तिकडे भ्रष्टाचार बोकाळलेला होता. औषधे व उपकरणांच्या खरेदीत झालेला भ्रष्टाचार तर एव्हढा प्रचंड होता की, त्याची व्याप्ती ही शब्दांमध्ये मोजणे देखील कठीण होऊन बसलेले आहे. हा भ्रष्टाचार उघड झाल्यानंतर त्याची चौकशी करण्याची मागणी होऊ लागली. त्या वेळी सन २०२२ साली या संपूर्ण घोटाळ्याची माहिती समोर

**पोस्टमार्टम ८३**

येण्यासाठी रुग्णालयाचे लेखापरीक्षण केले गेले. या लेखापरीक्षणाचा अहवाल दि. ५ जुलै २०२२ रोजी आरोग्य उपसंचालक कार्यालय अकोला यांच्याकडे प्राप्त झाला.या लेखापरीक्षणात विविध पातळ्यांवर गैरप्रकार आणि भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले. त्यामुळे त्याची चौकशी होणे व दोषींवर कारवाई होणे गरजेचे होते. त्यासाठी अनुपालन अहवाल तयार करून त्यात दोषींवर कारवाई करण्यासाठी स्पष्टता हवी होती. यासाठी आरोग्य उपसंचालक कार्यालयाने एक अनुपालन अहवाल तयार करण्यासंदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर नितीन तडस यांना निर्देश दिले. मात्र, यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याऐवजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तडस यांनी प्रचंड दिरंगाई केली. डॉक्टर नितीन तडस या प्रकरणी इतके निर्लज्ज, बेशरम आणि बेमुर्वतखोर झाले होते की, त्यांना आरोग्य उपसंचालक कार्यालयाकडून सातत्याने पत्रे, स्मरण पत्रे, कारणे दाखवा नोटीस, अर्धशासकीय पत्रे देण्यात आली. मात्र, तडस यांनी अत्यंत निर्लज्जपणाचा कळस गाठत आपल्याच अधिकाऱ्यांच्या आदेशांना, नोटिशींना अक्षरशः केराची टोपली दाखवली. वरिष्ठांच्या आदेशाची इतकी बेदरकारपणे आणि निर्लज्जपणे आदेशांची

**जिल्हा सामान्य रुग्णालयात करोडो रुपयांचे साहित्य,उपकरणे खरेदी भ्रष्टचारातुन कमावलेली चल अचल संपत्ती / अपसंपदा पुराव्यानिशी प्रकाशित करून आरोपींचे खऱ्या चेहरयांचा पडदा फाश करणार**

पायमल्ली करण्याचे हे प्रकरण जिल्हा रुग्णालय प्रशासनाच्या इतिहासातील दुर्मिळच म्हणावे लागेल. वरिष्ठ जर वारंवार अनुपालन अहवालासाठी वारंवार पत्रे देत आहेत, तर तडस यांना यासंदर्भत अहवाल तयार करण्यासाठी तब्बल एक वर्षापेक्षा अधिकचा कालावधी का लागला, हा मोठाच प्रश्न आहे. या माध्यमातून डॉ.नितीन तडस हे भ्रष्टाचाऱ्यांना का वाचवू पाहत होते ? डॉक्टर तडस हे भ्रष्टाचाऱ्यांकडून एव्हढे उपकृत झाले होते का की, ते आपल्याच अधिकाऱ्यांना ठेंगा दाखवत होते? भ्रष्टाचार करणारा हा जेव्हढा दोषी असतो, तेव्हढाच दोषी हा भ्रष्टाचार दाबण्याचा प्रयत्न करणारा देखील असतो. त्यामुळे तडस यांनी या भ्रष्टाचाराला दाबण्याचा प्रय्तन केल्याचे सध्यातरी सिद्ध होत आहे. अशा स्थितीत भ्रष्टाचाऱ्यांवर कठोर कारवाई तर केली गेलीच पाहिजे, परंतु अशाप्रकारे भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या डॉक्टर नितीन तडस यांच्यासारख्या नालायक, बेशरम आणि बेमुर्वतखोर अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करायला पाहिजे. खरे तर आतापर्यंत तडस यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित होते. मात्र, अद्यापही त्यांच्यावर या भ्रष्टाचाराला दाबल्याप्रकरण म्हणावी तशी कारवाई करण्यात आलेली नाही. परंतु याचा अर्थ असा




अजिबात होत नाही की, डॉक्टर तडस यांचा काहीच दोष नाही. भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठी अहवालाला विलंब लावणे, हे सरळ-सरळ भ्रष्टाचाऱ्यांना साथ देण्यासारखे आहे. त्यामुळे तडस यांच्यावर लवकरात लवकर कठोर कारवाई करावी व करोडो रुपये भ्रष्टाचार प्रकरणात या साखळीत तत्कालीन भांडारपाल सह किती अधिकारी व कर्मचारी यांचा सहभाग होता ते प्रशासना समोर येईल अशी मागणी आता या प्रकरणातील तक्रारकर्ते करीत आहेत. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज देखील एकीकडे या भ्रष्टाचारात सामिल असलेल्यांवर कारवाईची मागणी करीत आहे, तर दुसरीकडे डॉक्टर नितीन तडस यांच्यासारख्या भ्रष्ट अधिकाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी करीत आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

# वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या वृद्ध महिलेचा मृत्यू

**जनसंचलन/ लोणार**

मंठा रस्त्यावर भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनाने दिलेल्या धडकेत जखमी झालेल्या ७० वर्षीय दिव्यांग महिलेचा उपचारादरम्यान १२ मे रोजी जिल्हा सामान्य रुग्णालात मृत्यू झाला. ११ मे रोजी या महिलेला रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनाने जबर धडक दिली होती. त्यात ही महिला गंभीर जखमी झाली होती.. मराठवाड्यातील रेती माफियांनी लोणार शहर परिसरात उच्छाद मांडला आहे. भरधाव वेगाने ही वाहने जातात.. त्यात पादचाऱ्यांचा तथा वाहन चालकांचा बळी जात




आहे. गेल्या दोना महिन्यांतील अशा प्रकारच्या अपघातामधील हा तिसरा बळी आहे मृत्यू पावलेली ही दिव्यांग महिला नेमकी कोण होती याची ओळख पटविण्याचे काम सध्या पोलिसा प्रशासन करत आहे. ज्या वाहनाने या महिलेला धडक दिली ते वाहनही अद्याप पोलिसांनी ताब्यात घेतलेले नाही. त्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह आहे.

# टीचर कॉलनीत घरफोडी ६८ हजारांचा ऐवज लंपास

**जनसंचलन/ खामगाव**

येथील टीचर कॉलनी भागात एका व्यावसायिकाचे घर फोडून अज्ञात चोरट्याने रोख रकमेसह ६८ हजारांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी तक्रारी वरून पोलिसांनी, गुन्हा दाखल केला आहे. टीचर कॉलनीतील ट्रान्सपोर्ट व्यवसायिक जमालउद्दीन मोहीउद्दीन देशमुख (४०) हे ३० एप्रिल रोजी वडिलांच्या उपचारकामी नागपूरला गेले होते. या संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या दरवाज्याचा कडी कोंडा तोडून आत प्रवेश केला व घरातील लाकडी कपाटाचे लॉक तोडून त्यातून ४० हजार रोख रक्कम, लहान मुलांच्या चैनपट्ट्या, बांगड्या तसेच त्यांच्या पत्नीच्या चांदीच्या चैनपट्ट्या असा एकूण ६८ हजारांचा ऐवज लंपास केला.ही घटना १२ मे रोजी उघडकीस आली. याबाबत जमालउद्दीन मोहीउद्दीन देशमुख यांनी शहर पोलीस स्टेशनला तक्रार दिली असून यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध कलम ३८०, ४५४, ४५७, भादंवी नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


# पाणीपुरवठा अधिकारी व ठेकेदार यांचे संगणमात नागरिक त्रस्त

## खराब पाण्याने करतेय ग्रामपंचायत नागरिकांचे समाधान नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

तालुक्यातील सावखेड तेजन हे गाव भलही विकासापासुन कोसो दुर आहे विकास भरगच्च नसेल तरी साचलेली गटारे, वर्षानु वर्षा पासून न झालेले रस्ते, गाव भर बोंबलत फिरणारी तरुण पिढी आणि गावाला पिडा लागून राहिलेला विषय म्हणजे पाणी, आता आमचं गाव मराठवाड्या सारखं टँकरवाडा झालं. इथे ग्रामपंचायत ने बांधलेल्या २ पाण्याच्या टाक्या त्यात एक गळकी असल्याची माहिती. आणि तिसरी चे बांधकाम सुरू असून ते २-३ वर्षात पूर्ण होण्याची शक्यता. अशा अनेक समस्यांना तोंड देत इथले नागरिक जगतात. ते सुद्धा आता मुक्के झालेत. त्यांना वाली उरला नाहीच. आमचा पाण्याचा प्रश्न मार्गी कोण लावणार आम्हाला जगण्याचा अधिकार आहेत की नाही. आसे सुज्ञ नागरिक प्रश्न उपस्थित करत आहेत रस्ते, लाईन, पाणी या शिवाय गावकरी मागतात तरी काय? गावकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी गावकऱ्यांनी बोलायचे कोणाला, ग्रामपंचायत सदस्याना हे प्रश्न सांगितले तर ते नागरिकांना तुम्ही काय करायचे करा या उमरट भाषेत बोलतांना दिसतात. मग अशा वेळी ग्रामपंचायती मधील सर्व जणांनी राजीनामे का देऊ नाहीत. का तुम्ही तुमच्या नावाला लेबल लावून ठेवले आहे. की ग्रामपंचायत तुम्हालाच खायची आहे हा प्रश्न उपस्थित होतो आहे. नागरिकांची गैरसोय होणे केव्हा बंद होईल हा सर्व सामान्य नागरिकांनी ग्रामपंचायत ला विचारलेला प्रश्न आहे. सावखेड तेजन गावा साठी २ कोटी ६४ लाख ३० हजार ८२८ रुपयांची जल जीवन मिशन अंतर्गत काम सुर आहे. या कामामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्ट्राचार झाल्याचं दिसत. ग्रामसेवक व सरपंचाचे कॉल ठेकेदार घेत नसल्याचं त्यांनी सांगितलं. असे असेल तर ठेकेदार काम करतो कसे




या वर ग्रामपंचायत आवाज का उठवत नाही. की ते सुध्दा गूळ खाऊन गप्प बसलेत. गावामध्ये काही ठिकाणी नवीन पाईप टाकले तर गावातील काही भागांमध्ये जुन्याच पाईप लाईन वरून काम धकून काम मार्गी लावल्याचे दिसून आले.

एक वर्षा अगोदर दैनिक लोकनेता ने पाण्यासंबंधात वृत्त प्रकाशित केले होते, तेव्हा ग्रामपंचायत ने एक महिन्यामध्ये नवीन पाईप टाकून देऊ असे आश्वासन दिले होते, परंतु आज पर्यंत ग्रामपंचायत ने कोणते आश्वासन पूर्ण केले नाही. असे असेल तर मग आमची ग्रामपंचायत काय करते हा प्रश्न नागरिकांना पडलेला आहे.

# पिंपळगावलेंडी येथून शेतकऱ्यांचा बैल चोरट्यांनी पळवला..

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा तालुक्यातील पिंपळगाव लेंडी येथील शेतकरी शिवाजी मच्छिंद्रनाथ गायके यांचा एक बैल चोरट्यांनी पळविल्याची घटना दिनांक १० मे रोजी मध्यरात्री घडली आसून किंनगावराजा पोलीस स्टेशन मध्ये बैल चोरिला गेल्याची एन.सी दाखल करण्यात आली. पुढील तपास किंगगावराजा पोलीस करित आसुन सदरिल घटना कि दररोजच्या प्रमाणे संध्याकाळी दोन्ही बैलांना चारा पाणी करून दोन्ही बैलांना गोठ्यात बांधले आसता चोरट्यांनी लक्ष ठेऊन त्या बैलाचा जोडीदार पळविला



आसता बैलाचा रंग भुरकट तांबड्या रंगाचा आहे वरील वर्णन सदरिल बैल कोणास आढळल्यास किंनगावराजा पोलीस स्टेशन ला संपर्क करावे असे आवाहन करण्यात आले आहे

# जिल्ह्यात अवैध गुटखा विक्री...

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्रात गुटखाबंदी करण्यात आली आहे. गुटखाबंदी झाल्यानंतर सुरुवातीला काहीकाळ गुटखा उत्पादक धास्तावले होते. मात्र, गुटखा उत्पादक, विक्रेत्यांनी समांतर व्यवस्था उभी करून बेकायदा गुटखा विक्रीचे जाळे निर्माण केले आहे. बाहेरील राज्यातून येणारा अवैध गुटखा किरकोळ तसेच घाऊक विक्रेत्यांकडे येत आहे. जिल्ह्यात राजरोसपणे त्याची विक्री सुरू आहे. राज्य शासनाने गुटखा विक्रीवर बंदी घातली असली तरी या बंदीच्या आदेशाची पायमल्ली होताना दिसून येत आहे. पानाच्या टपऱ्या तसेच काही किराणा दुकानांतून मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारचा गुटखा विकला जातो. काही दिवसांपूर्वी नांदुरा येथे पोलिसांनी केलेल्या कारवाईत ३० लाखांचा गुटखा व ट्रक जप्त करण्यात आला. संबंधितांवर पोलिसांनी कारवाई




केली आहे. मात्र, अन्य ठिकाणी गुटखा विक्री सुरू असताना कारवाईत सातत्य ठेवणे आवश्यक आहे. अनधिकृतरीत्या गुटखा विक्री करणाऱ्यांची चांदी होत असली तरी तरुण वर्ग मात्र मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या आहारी जात आहे. गुटखाबंदीचा कायदा करून सरकारने गुटखा विक्री तसेच उत्पादन व वाहतूक यावर निर्बंध लादले. मात्र, काही महाभागांनी सुपारी व तंबाखू, अशा दोन पुड्या तयार करून यापासून पळवाट काढण्याचा प्रयत्न केला. सरकारने तोही हाणून पाडत अशा प्रकारच्या उत्पादनांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.त्याचे पालन होणे आवश्यक आहे.

# रेती तस्करीचा दीड महिन्यांपूर्वीचा गुन्हा दाखल...

**जनसंचलन/दुसरबीड**

अवैध वाळू तस्करी प्रकरणी जमावावर गुन्हा दाखल होतो. त्यानंतर रेती तस्करी रोखण्यासाठी रस्ते खोदून बंद करण्यात येतात. जमावातील निष्पन्न झालेल्या त्या आरोपींवर कारवाई करा म्हणून महसूल उपविभागीय अधिकारी निर्देश देतात. मात्र तरीही पोलिस यंत्रणा ढिम्मच असल्याचे अफलातून चित्र तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे. तालुक्यातील निमगाव वायाळ येथे २६ मार्च रोजी खडकपुर्णा नदी पात्रातून ४० ते ४५ मजूर अवैध रेती उत्खनन आरोपी मोकाटच करुन चार ट्रॅक्टरमध्ये भरत असल्याची खबर महसूल यंत्रणेला मिळाली. त्यावर कारवाई करण्यासाठी प्रतिबंधक टीम तेथे पोहोचली. मात्र टीम पोहोचल्यावर त्यांनी व्हिडिओ चित्रण केले. हे चालू असतांनाच रेती भरणारे मजूर व ड्रायव्हर तेथून पळून गेले. त्यानंतर हातात खोदण्या, भरण्याची हत्यारे घेऊन मजूर व ड्रायव्हर परतले. त्यातील तीन ड्रायव्हरांनी पथकातील



यशवंत घरजाळे व विष्णू थोरात यांच्या अंगावर ट्रॅक्टर नेण्याचा प्रयत्न करीत, तेथून पळून गेले. चौथे ट्रॅक्टर नेण्याचा प्रयत्न करीत असतांनाच निमगाव ग्रामस्थ व तत्कालीन तहसीलदार सचिन शंकरलाल जैस्वाल हे तेथे पोहोचल्याने तो प्रयत्न फसला. या प्रकरणी तहसीलदार जैस्वाल यांच्या फिर्यादीवरुन अप. नं. ७२/२०२४ कलम ३५३, ३७९, ५०६, १४३, १४७, १४९ भादंवि सहकलम महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७), ४८ (८) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्याचा तपास दुय्यम ठाणेदार युवराज राठोड यांच्याकडे सोपवण्यात येतो. एवढे सगळे गंभीर प्रकार झाल्यावर रेती माफियांवर कडक कारवाईचा बडगा उगारला जाईल, अशी अपेक्षा होती. दरम्यान निमगाव वायाळ प्रकरणात विविध माध्यमांतून आरोपींची ओळख पटली जावून सुद्धा त्यांच्यावर अद्यापही कोणत्याही प्रकारची कारवाई केली गेलेली नाही. या बाबतीत एसडीओ संजय खडसे यांनी ठाणेदारांना वेळोवेळी निर्देश देऊनही काहीच उपयोग झाला नसल्याचेच आहे.

# मद्यधुंद मतदान केंद्र अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा

**जनसंचलन/मलकापूर**

मतदान केंद्र अधिकारी म्हणून नियुक्तीवर असलेल्या एकाने दारूच्या नशेत गैरवर्तणूक केल्याप्रकरणी एका सहायक मलकापूर पोलिसांत रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला. नितीनकुमार वामनराव सोळंके (सहायक लेखाधिकारी, पं. स. लोणार, बुलढाणा), असे या संशयिताचे नाव आहे. रावेर लोकसभा मतदारसंघातील मलकापूर विधानसभा मतदारसंघात सोळंके




यांची नियुक्ती करण्यात आली होती. १३ मेरोजी मतदान होणार असताना सर्वच मतदान अधिकारी व कर्मचारी १२ मेरोजी मतदान केंद्रात पोहोचले होते. यावेळी भरारी पथकाचे शत्रुघ्न चंद्रभान हागे यांनी अचानक मतदान केंद्रांना भेटी दिल्या. त्यावेळी सोळंके हे दारूच्या नशेत आढळून आले. पथकासोबत त्यांनी गैरवर्तणूक केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिवकालीन मर्दानी मार्शल आर्ट्स व क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**जनसंचलन/खामगाव**

खामगाव स्वामी विवेकानंद नवयुवक दल व माँ भारती प्रतिष्ठाण यांच्या वतीने शिवकालीन पारंपारिक मर्दानी युद्धकलेचा प्रसार- प्रचार होण्यासाठी भव्य शिवकालीन मर्दानी युद्धकला व खेळ प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आहे. सदर शिबिर १६ ते २६ मे पर्यंत दररोज सकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत श्री वारकरी भवन, श्रीधर महाराज संस्थान (चोपडे यांच्या मळ्यात) येथे होणार आहे. यामध्ये विदर्भातील नामांकित तालीम संघाच्या प्रशिक्षकांद्वारे लाठीकाठी, तलवारबाजी, दांडपट्टा, चक्रपाश, अग्नीपाश, नियुद्ध तसेच विशेष आकर्षण म्हणुन त्राटक (मन शांती व एकाग्रता वाढविण्यासाठी) याचे देश, धर्म व संस्कृती या विषयावर वत्क्यांकडून मार्गदर्शन करण्यात येणार. शिबिरार्थीचे किमान वय ५० वर्षे असावे, पुरुष व महिलांना सुद्धा शिबिरात सहभागी होता येईल. या प्रशिक्षणासाठी ३०० रूपये प्रशिक्षण फि (समर्पण मुल्य) राहणार पुरुष व महिलांची स्वतंत्र व्यवस्था राहणार आहे. नाव नोंदणीसाठी ॲड. संजयकुमार बडगुजर मो. ७९७२९१२००५, सचिन चांदुरकर मो. ९४२३०५७२७४, चेतन गोडाळे मो. ८६००३३६४१५, गौतम पंडा मो. ९९७५७९९३५३ यांच्याशी संपर्क साधावा, प्रशिक्षणादरम्यान आपातकालीन वैद्यकीय सुविधेसाठी डॉ. अविनाश गुजर मो. ९१५२७५३३९५, प्रशिक्षण वर्ग अधिकारी सौ मनिषाताई चांदुरकर मो. ९८२३७५२६७७, प्रशिक्षण संयोजिका सौ. सविताताई बडगुजर मो. ९०४९८८८४५३ असुन व्यवस्थापन समिती मध्ये सौ. पुनमताई राजपुत, सौ. स्मिताताई तायडे, सौ. सपनाताई पटवे, सौ. दुर्गाताई अढाऊ, सौ. सुरेखाताई जोशी, सौ. सुचिताताई वानखडे, सौ लिनाताई निंबेकर, सौ. स्मिताताई धोबेकर, सौ. तनश्रीताई रंग, सौ. संगिताताई जवंजाळ, राजेश पुरवार, सचिन वानखडे, अमोल जोशी, सागर खिरडकर, गौरव खत्री, निखिल खिरोडकर यांचा समावेश आहे. शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# रावेर लोकसभा मतदार संघासाठी निमगाव येथे ६३ टक्के मतदान

**जनसंचलन/ निमगाव**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात असलेल्या रावेर लोकसभा मतदारसंघासाठी निमगाव येथे झालेल्या मतदानात १३ मे रोजी ६३.६६ टक्के मतदान शांततेत झाले. यामध्ये एकूण ६,९२८ मतदानापैकी ४४११ मतदारांनी आपला मतदनाचा हक्क बजावला. यामध्ये १९७६ महिला व २४३५ पुरुषांनी आपला मतदानाचा हक्क बजावला यामध्ये बुथ क्रमांक ४० मध्ये १३१८ पैकी ८२९ मतदान झाले त्यामध्ये ३७४ महिला, ४५५ पुरुष, बुथ क्रमांक ४१ मध्ये १२५१ पैकी ७८७ मतदान झाले त्यामध्ये ३४८ महिला, ४३९ पुरुष, बूथ क्रमांक ४२ मध्ये १२७६ पैकी ८२० मतदान झाले. त्यामध्ये ३८२ महिला, ४३८ पुरुष. बुथ क्रमांक ४३ मध्ये, १२४२ पैकी ७६० मतदान झाले. त्यामध्ये ३३४ महिला ४२६ पुरुष, बूथ क्रमांक ४४ मध्ये ११८१ पैकी ७५५ मतदान झाले. त्यामध्ये ३४३ महिला, ४१२ पुरुष, बूथ क्रमांक ४५ मध्ये ६६० पैकी ४६० मतदान झाले. त्यामध्ये १९५ महिला, २६५ पुरुषांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यावेळी सर्व उमेदवारांचे भाग्य हे मतपेटीत बंद झाले असून सर्वपक्षीय नेते हे आपापला उमेदवारच विजयी होणार याचा दावा करत आहेत. तरी रावेर लोकसभा मतदारसंघात सत्ता बदल की वन्स मोर याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. यावेळी नांदुरा ठाणेदार विलासराव पाटील यांचे मार्गदर्शनात पोलीस हेडकॉन्स्टेबल गजानन इंगळे, हेडकॉन्स्टेबल शाम आघाव आपल्या सर्व सहकाऱ्यांसोबत निमगाव येथे मतदान शांततेत होण्यासाठी सहकार्य करीत होते. यावेळी मलकापूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार राजेशजी एकडे, भारतीय जनता पार्टीचे युवा नेते यश कुमार संचेती यांचे सह सर्वपक्षीय नेत्यांनी निमगाव मतदान केंद्रावर भेटी देऊन मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी प्रथमच लोकसभा निवडणुकीत उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला सर्व बुथवर सकाळपासून संध्याकाळपर्यंत रांगाचं रांगा दिसत होत्या.

# शेगाव येथील वसतीगृहातील प्रवेश प्रक्रियेस सुरवात

**जनसंचलन/बुलडाणा**

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या अधिनस्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह शेगाव, जि. बुलढाणा येथील वसतीगृहातील शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. मागासवर्गीय प्रवर्ग निहाय आरक्षित टक्केवारीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, जमाती, आर्थिकदृष्ट्या, तसेच इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, दिव्यांग आदी प्रवर्गातील विद्यार्थी प्रवेशास पात्र राहणार आहेत. शालेय, कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयीन, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरीता व शेगाव येथील नगरपालिकेच्या हद्दीतील शाळा, विद्यालय, महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षातील प्रवेशित विद्यार्थी प्रवेश अर्ज भरण्यास पात्र आहेत. प्रवेश अर्ज वसतिगृहात विनामुल्य उपलब्ध आहे. पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरावेत. असे आवाहन वसतिगृहाचे गृहपाल व्ही. ल. बघे यांनी केले आहे. आधिक माहिती करिता भ्रमनध्वनी क्रमांक ८२०८६६१४८८ यावर संपर्क साधावा किंवा प्रत्यक्ष वसतिगृहाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विश्राम पवार व अण्णासाहेब पवार यांची दिंडोरी लोकसभेत निरीक्षक म्हणून निवड

**जनसंचलन/बुलढाणा**



बुलढाणा येथिल भाजपा कामगार मोर्चा चे प्रदेश सचिव श्री विश्रामजी पवार तसेच कामगार मोर्चाचे प्रदेश कार्यकारीणी सदस्य श्री अण्णासाहेब पवार यांची नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी लोकसभा क्षेत्राच्या महायुती भाजपा उमेदवार केंद्रीय मंत्री श्रीमती भारतीताई पवार यांच्या प्रचार नियोजनासाठी भाजपा कामगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष श्री विजयजी हरगुडे यांच्या आदेशाने सभा निरीक्षकह्न म्हणून निवड करण्यात आली आहे. श्री विश्राम पवार सर यांच्याकडे चांदवड-देवळा व निफाड विधानसभा क्षेत्राची जबाबदारी देण्यात आली आहे तर श्री अण्णासाहेब पवार यांच्याकडे नांदगाव व येवला विधानसभा क्षेत्रासाठी निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दिंडोरी लोकसभा क्षेत्राचे २० मे २०२४ मतदान होणार आहे. यासाठी दोन्ही नेत्यांना दिंडोरी आपापल्या क्षेत्रात मुक्काम ठोकून योग्य अहवाल पक्षाला सादर करावा लागणार आहे. या दोन्ही नियुक्तीबद्दल श्री विश्राम पवार तसेच श्री अण्णासाहेब पवार यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. या मिळालेल्या जबाबदारी बद्दल दोन्ही नेत्यांनी आपल्या नियुक्तीचे व जबाबदारी बद्दल पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब, भाजपा प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब, भाजपा कामगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष श्री विजयजी हरगुडे साहेब यांचे आभार व्यक्त करत मिळालेल्या जबाबदारीला पूर्ण क्षमतेने न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्याची भावना व्यक्त केली आहे.

# सिंदखेडराजा येथील बसस्थानकावर प्रवाशांना पिण्याच्या पाण्याची सोय नाही...

## चक्क प्रवाशांना पिण्याचे पाणी घ्यावे लागते विकत...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

येथील बसस्थानकावर व्यक्तींना पिण्याच्या पाण्यासाठी विकतचे पाणी घ्यावे लागत असल्याची परिस्थिती आहे. सिंदखेडराजा हे विदर्भाचे प्रवेशद्वार असलेले प्रमुख शहर आहे. पुणे, छत्रपती संभाजी नगर, जालना मार्गाने नागपूरकडे जाणाऱ्या बसेस येथील बसस्थानकावर येत असतात. देऊळगावराजा मार्गाने नागपूर दूर पडत असल्याने ह्या मार्गाने बसेसची संख्या जास्त आहे. तसेच येथे दर सोमवारी आठवडी बाजार भरतो. आजुबाजुला असलेल्या पळसखेड, सावखेड तेजन, हनवतखेड, माहेरखेड, वाघोरा, आडगाव राजा, पिंपरखेड, चिंचोली, शेलू, भोसा, डावरगाव, धांदरवाडी, अंचली, नसीराबाद, माळ सावरगाव , बामखेड, असोला, बोरखेडी बावरा, पळसखेड झाल्टा, तुळजापूर आदि खेड्यापाड्यांतील ग्रामस्थांसाठी ही प्रमुख बाजारपेठ आहे. खाजगी वाहनांची संख्या वाढत असली तरी एसटी बसला प्राधान्य असते. तर खाजगी वाहनांचा राबता बसस्थानकाजवळच असतो. त्यामुळे दोन्ही प्रकारच्या प्रवाश्यांना वाहनांची वाट बघण्यासाठी बसस्थानकावरच थांबावे लागते. सुरुवातीला केल्या गेलेली पिण्याच्या



पाण्याच्या व्यवस्थेतील सामुग्री नादुरुस्त व तूटफुट झाल्यावर, दुरुस्ती न केली जाता अजूनही त्याच अवस्थेत आहे. त्यामुळे प्रवाशांना पिण्याच्या पाण्यासाठी आजूबाजूच्या हॉटेल्स मध्ये जावे लागते. नाहीतर पाण्याची बॉटल विकत घ्यावी लागते. त्यामुळे एसटी महामंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळीच दखल घेऊन उपाययोजना करण्याची गरज आहे.

# सत्तेसाठी ते काँग्रेससोबत अमित शहा यांची उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका...

वृत्तसंस्था/मुंबई

दहशतवादी कसाबला पाठीशी घालणाऱ्या काँग्रेस पक्षासोबत उद्धव ठाकरे यांनी केवळ सत्तेसाठी हातमिळवणी केली असून ते त्यांच्या मांडीवर बसले आहेत. असे करताना लाज वाटत नाही का, अशी घणाघाती टीका वसई येथील सभेत केंद्रीय गृहमंत्री मंत्री अमित शहा यांनी सोमवारी केली. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनाही त्यांनी लक्ष्य केले. भाजपचे उमेदवार डॉ. हेमंत सवरा यांच्या प्रचारासाठी शहा यांची जाहीर सभा वसईच्या सनसिटी मैदानात सोमवारी सायंकाळी आयोजित करण्यात आली होती. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विवेक पंडित, पालकमंत्री रवींद्र चव्हाण, माजी खासदार राजेंद्र गावित यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. एकनाथ शिंदे यांचा उल्लेख खऱ्या शिवसेना पक्षाचे मुख्यमंत्री असा करत शहा यांनी भाषणाला सुरवात केली. पाकिस्तानने आजवर भारतात अनेक हल्ले केले. मात्र पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानला सडेतोड उत्तर देण्याचे काम केले आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे, राहुल गांधी, ममता बॅनर्जी हे पंतप्रधान होऊ शकत नाहीत आणि झाल्यास पाकिस्तानला जशास तसे उत्तर देऊ शकत नाहीत, असे ते म्हणाले. मतपेढी कमी होईल या भीतीने राम मंदिर प्राणप्रतिष्ठेचे आमंत्रण असतानाही शरद पवार, सुप्रिया सुळे त्या कार्यक्रमास उपस्थित राहिल्या नाहीत, असा आरोपही त्यांनी केला. महाविकास आघाडीला देशाची चिंता नाही. सोनिया गांधी या केवळ आपल्या मुलाला पंतप्रधान करण्याची स्वप्ने पाहत आहेत. दुसरीकडे शरद पवार-सुप्रिया सुळेंना, उद्धव ठाकरे आदित्य ठाकरेंना, लालूप्रसाद यादव आपल्या मुलाला मुख्यमंत्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. मात्र केवळ नरेंद्र मोदी हेच देशाच्या विकासासाठी धडपडत आहेत, असेही शहा म्हणाले.यावेळी शहा यांनी मोदी सरकारने साधलेल्या उपलब्धींची माहिती दिली. अन्न, वस्त्र, निवारा यांसह विविध योजना राबवणे, आदिवासी समाजासाठी अनेक विकासात्मक कामे, महिला आरक्षण, देशाची अर्थव्यवस्था सुधारणे आणि कलम ३७० हटविण्यासह लिंक रोड, बुलेट ट्रेन, मेट्रोचे जाळे अशी अनेक कामे मोदी सरकारने केली आहेत, असे ते म्हणाले. तसेच वसई विरारमध्ये सूर्या प्रकल्पाचे १८५ एमएलडी पाणी देण्याचे काम देवेंद्र फडणवीस यांनी केले असून रोरो सेवा, गॅस पाइप लाइन आदी कामे केल्याचा दावा त्यांनी केला.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी आणि अमित शहा यांची प्रशंसा केली. आज आपल्या देशात राहून पाकिस्तानचे गोडवे गाणाऱ्यांना लाज वाटत नाही का, असा प्रश्न त्यांनी विरोधकांना केला. मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी इक्बाल मुसा याला उबाठा गटातर्फे प्रचारात उतरल्याचे सांगत हे बघून बाळासाहेबांच्या मनाला यातना होत असतील असे ते म्हणाले.





